**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

# प्रेसनोट दिनांक - ०२/१२/२०२३

**दि.०१/१२/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण १०३८/२०२३ भा द वि क ३०७, ४५२, १४३, १४७, १४८, १४९, ४२७, ५०४, ५०५ क्रिमिनल अमेंडमेंट कलम ७,आर्म ॲक्ट कलम४(२५) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ३०/११/२०२३ रोजी १८/३० वा.चे सुमा. मौजे मेदनकरवाडी गावचे हद्दीत इंद्रप्रस्थ सोसायटी राहते घरात व घरासमोर ता.खेड जि.पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि ०१/१२/२०२३ रोजी ०४/०२ वा |
| फिर्यादी | :- | विनोद मंगल पाटील वय ४३ वर्षे व्यवसाय ड्रायव्हर रा.इंद्रप्रस्थ सोसायटी घर नं ए ३५,मेदनकरवाडी चाकण मु.पो. घरताड ता.चोपडा. जि.जळगाव |
| आरोपी | :- | १)आशीतोष टिपाले २)फारुख पठाण ३) ऋतीक कोरे उर्फ नाण्या ४)विशाल पुर्ण नाव माहीत नाही ५)वैभव भाकरे पुर्ण नाव माहीत नाही सर्व रा.मेदनकरवाडी व चाकण ता.खेड ६)गणेश किसन जोगदंड वय २१ वर्षे राबालाजीनगर मेदनकरवाडी चाकण ७)तुषार विकास सोनवणे वय १९ वर्षे रा.मेदनकरवाडी व चाकण ता.खेड८)मनोज विनयकांत शर्मा वय २७ वर्षे ९)नागेश बळीराम चीम वय २१ वर्षे रा वैदवाडी बालाजीनगर चाकण जि.पुणे व त्यांचे सोबत ३ ते ४ इसम **आरोपी क्र.६ ते ९ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी इंद्रप्रस्थ सोसायटी मेदनकरवाडी राहते घराचे समोर गाडीचा कट मारल्याच्या कारणावरुन आरोपी क्र १ याचे बरोबर झालेले किरकोळ भांडणावरुन त्याचा राग मनात धरुन आरोपी क्र १ व २ यांनी फिर्यादीचे घरात घुसुन त्यांना शिवीगाळी करुन फिर्यादीचा मुलगा पराग यास ओढत बाहेर आणुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व चष्मा फोडला त्यानंतर पुन्हा फिर्यादी यांचे घराचे समोर नमुद सर्व आरोपी यांनी लोखंडी कोयते व लाकडी दांडके घेवुन येवुन फिर्यादीची ॲक्टीव्हा गाडी एम एच १२/जी क्यु/६८७९ हिचेवर कोयते व दांडक्यानी मारुन मोडतोड केली तसेच घराच्या खिडकीच्या काचा फोडल्या ,दरवाज्यावर कोयता व दांडक्यानी मारुन घरावर दगडी टाकुन नुकसान करुन आरोपी क्र १ याने तुला आता मी जिवंत सोडणार नाही ,तुला संपवतोच असे म्हणुन कोयत्याने फिर्यादीचे पायावर वार करुन जखमी करुन आरडाओरडा दहशत करीत रस्त्याचे कडेला उभ्या असलेले गाड्यांची तोडफोड करीत फिर्यादी यांना शिवीगाळी करीत निघुन गेले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि मोरखंडे ९९२११११८१०० |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी ८११/२०२३, भा.द.वि.क- ३९५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.३०/११/२०२३ रोजी २३:३० ते दि-०१/१२/२०२३ रोजीचे ०४:०० वाचे पुर्वी मौजे खराबवाडी ता खेड जि पुणे येथील इंडीयन ऑईल पंपाजवळ |
| गुन्हा दाखल | :- | दि.०१/१२/२०२३ रोजी २०३५ वा |
| फिर्यादी | :- | विजय तुकाराम पिंगळे वय ५२ वर्षे धंदा चालक राहणार मु.पो. माळवाडी (लाटे) तालुका बारामती जिल्हा पुणे |
| आरोपी | :- | अनोळखी ५ ते ६ व्यक्ती, त्यापैकी तिघांची नावे बबलु, सागर, दाजी (पुर्ण नाव पत्ते माहिती नाही) **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे ताब्यातील ट्रक नंबर एम.एच.०९ /एफ. एल/ ८१९१ यामध्ये रिलायन्स इंडस्ट्रीज महाळुंगे येथील प्लॅस्टिक दाना असलेले ८०० बॅग भरुन ते फरसुंगी पुणे येथे खाली करण्यासाठी जात असताना मौजे खराबवाडी येथील इंडीयन ऑईल पंपाजवळ गाडी बाजुस उभी करुन काही वेळ |

आराम करीत असताना फिर्यादी यांचे गाडीमध्ये नमुद आरोपी जबरदस्तीने शिरुन फिर्यादीचे तोंडावर चापटी मारुन हाताने मारहान करुन फिर्यादीचे तोंडावर टॉवेल टाकुन फिर्यादीचे ताब्यातील १७,००,०००/- रु किंचा टाटा कंपनीचा ३१३८ मॉडेलचा १२ चाकी ट्रक नं एम.एच०९/एफएल ८१९१ जबरस्तीने चालवित नेवुन फिर्यादीचे जवळील ३०००/- रु रोख रक्कम व २,३००/- रु किं चा सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन व ट्रक मधील २०,००,०००/- रु किं चे प्लॉस्टीक दान्याचे ८०० बॅग भरलेला माल ट्रकसह फिर्यादी कडुन काढुन घेतला व फिर्यादीस तळेगाव पोलीस स्टेशनचे जवळ अनोळखी स्त्यावर सोडुन दिले आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनिरी विलास गोसावी, मो.नंबर ९८८१५९५८९१

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी ११६४/२०२३ भा.द.वि. कलम ३६४, ३२६, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४९, आर्म ॲक्ट ४(२५), क्रिमिनल लॉ ॲमेंडमेंट कलम ७, महा. पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.३०/११/२०२३ रोजी २१/३० वा. ते २३/३० वा. पर्यंत शंकरनगर, एक्साईट बॅटरी कंपनीजवळ, मोहननगर, चिंचवड पुणे ते गोलांडे चाळ, चिंचवड ते चिंचवड रेल्वे स्टेशन पत्राशेडजवळ, पुणे.

गुन्हा दाखल :- दि०१/१२/२०२३ रोजी २१.०८ वा

फिर्यादी :- रोहन मच्छिंद्र यादव, वय १९ वर्षे, व्यवसाय शिक्षण, रा. आनंदनगर, चिंचवड, पुणे.

आरोपी :- १) विनय ऊर्फ अरून गब्बर भोसले,
२) इंदर भोसले,
३) बंटी कांबळे, व त्याचा मित्र
४)नंदिणी गब्बर भोसले,
५) अजय भोसले,
६) अंजली भोसले,
७) अरुणा भोसले,
८) रागिनी भोसले,
९) निलम भोसले
सर्व रा. मोहननगर, चिंचवड, पुणे.
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी वाढदिवस कार्यक्रमाकरीता फिर्यादी त्यांचा मित्र श्रवण याला त्याच्या घरी शंकरनगर, एक्साईट बॅटरी कंपनीजवळ, मोहननगर, चिंचवड, पुणे येथे घेण्यासाठी गेले असता त्यांना आरोपी क्र ४ व आरोपी क्र ६ ,७,८,९ यांनी पकडुन पुर्वीचे भांडणाच्या कारणावरुन वाईट वाईट शिवीगाळ करून, हाताने मारहाण करुन आरोपी क्र ४ हिने आरोपी क्र ५ आरोपी क्र १, २,३ व त्याचा मित्र अशांना बोलवुन घेऊन त्या सर्वांनी फिर्यादी यांना वाईट वाईट शिवीगाळ करून, लाथाबुक्यांनी व सिमेंटच्या गट्टुने मारहाण करून, आरोपी क्र १ याने फिर्यादी यांचे पाठीमागे डोक्यात कोयत्याने वार करून गंभीर जखमी करून आरोपी क्र १ व त्याचे साथीदारांनी फिर्यादी यांना जबरदस्तीने उचलून ॲक्टीव्हावरून गोलांडे चाळ, चिंचवड येथे रात्री ११/०० वा. चे सुमारास आणून कोणाचेतरी मोबाईलमध्ये फिर्यादी यांची खोटी रेकॉर्डींग करून, रबरच्या पाईपने मारहाण करून, इलेक्ट्रीक स्कुटीवरून चिंचवड रेल्वे स्टेशन पत्राशेडजवळ येथे घेवून जावून त्याला रेल्वेच्या खाली टाकू असे बोलत असतांना आरोपी क्र १ यास कोणाचातरी फोन आल्याने रात्री ११/३० वा. चे सुमारास फिर्यादी यांना पुन्हा गोलांडे चाळीजवळ त्यांचे आई वडीलांकडे सोडून फिर्यादी व त्यांचे आई वडीलांना सदर प्रकाराबाबत कुठेही वाच्यता करुन नका अन्यथा तुम्हाला सोडणार नाही अशी धमकी दिली आहे. म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि गुळींग ९५५२५७४३१६

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- सांगवी ६१४/२०२३ भा. द. वि कलम ३२५,३२३,५०४,३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ३०/११/२०२३ रोजी ०८/१५ वा. अष्टविनायक हौसिंग सोसायटी तुळजा भवनीनगर, पिंपळे गुरव, पुणे या ठिकाणी

गुन्हा दाखल :- दि ०१/१२/२०२३ रोजी ०० /२४ वा

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी |
| आरोपी | :- | १)महीला आरोपी<br>२) तेजस लेंभे रा. अष्टविनायक हौसिंग सोसायटी तुळजा भवनीनगर, पिंपळे गुरव, पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी व सोसायटीतील महिला सोसायटीचे खाली पाणी भरण्याकरीता जमले असता आरोपी क्र १ हया देखील खाली पाणी भरण्याकरीता आल्या होत्या त्या त्यांच्या पाण्याचे बाटल्या पिण्याचे टाकीतच धुवून ओतत होत्या तेंव्हा तक्रारदार त्यांना म्हंटले की तुम्ही बाटल्या टाकीत धुवून त्यामध्ये पाणी ओतू नका असे म्हंटल्या असता आरोपी क्र १ यांनी फिर्यादी यांना शिवीगाळ करुन त्यांचा मुलगा आरोपी क्र २ यांनी फिर्यादी यांना हाताने मारहाण करुन गंभीर दुखापत करण्याचे हेतुने ढकलून दिले त्यामध्ये फिर्यादी यांचा उजवा हात फॅक्चर झाला आहे म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि गावडे ९०२८०४३३२६ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दिघी ६५०/२०२३ भा. द. वि कलम ४२०,१२०(ब),३८४,५०६, ४०६,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०१/०२/२०२० पासुन आज पर्यन्त दिघी ता.हवेली जि.पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०१/१२/२०२३ रोजी १७/१४ वा. |
| फिर्यादी | :- | मंगेश मारुती वाळके वय-४० वर्षे,व्यवसाय – बिल्डींग मटेरीयल सप्लायर्स,रा-मारुती मंदीरा जवळ दिघी गावठाण दिघी, |
| आरोपी | :- | १)अशिष गंगाधर मुटके वय-४२ वर्षरा-अशोका हॉटेल शेजारी भोसरी-नाशिक रोड भोसरी पुणे<br>२)अरवींद रघुनाथ वंजारे वय-५२ वर्ष रा-गजानन महाराज मंदीर मॅक्झीन चौक दिघी,पुणे<br>३)अशोक रेवप्पा सावंत वय-४७ वर्ष रा.माहीत नाही<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी आरोपी क्र १ ते ३ यांनी संगनमत करुन फिर्यादीच्या मालकीची गाडी एम.एच१४.जी.वाय-३७५६ मॉडेल-MARUTI VITARA BREZZA-VDI,चासी नं- MA3NYFB1SJE ३८५५७०,इंजीन नं- D13A-५६४९४५५, रंग- BLAJING RED इंधन-डिझेल ही गाडी व कागदपत्रे ही आरोपी क्र-१ याने स्वता कडे ठेवुन घेवुन परस्पर फिर्यादीस काही एक माहीती न देता आरोपी क्र-२ व आरोपी क्र ३ यांचे कडे गहाण ठेवुन या तीघांनी संगणमत करुन फिर्यादी कडुन अतीरीक्त रक्कम उकळण्या करीता फिर्यादीची गाडी जाळुन टाकायची व जीवे मारुन टाकायची धमकी देवुन फिर्यादी कडुन ३,५०,०००रुपये (तीनलाख पन्नास हजार रुपये अक्षरी)घेवुन फिर्यादीची आर्थिक फसवणुक केलेली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि शिखरे ८७८८१८१७१४ |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी १३४७/२०२३ भादवि कलम ३०४ (अ), २७९, मोटार वाहन अधि. कलम ११९/१७७, १८४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.३०/११/२०२३ रोजी १८.०० वा.चे सुमारास कॉग्नीझंट कंपनी फेज-३, माण ता.मुळशी जि.पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.०१/१२/२०२३ रोजी १६.३३ वा. |
| फिर्यादी | :- | प्रभाकर चंद्रय्या अनलदास वय-६३ वर्षे धंदा-सेवा निवृत्त, रा.घर नं.१५६० ए दाजी पेठ बालाजी मंदीर जवळ, |
| आरोपी | :- | १)गणपत मुकुंद इंदलकर वय-३१ वर्षे रा काळेवाडी फाटा, महादेव कॉलनी थेरगाव पुणे (भारत बेंझ कंपनीचा डंपर क्र. एम.एच.१४ एच.यु. ७९६७ वरील चालक)<br><br>२)रेहांत रमजान अहमद वय-२६ वर्षे रा. गंगारामवाडी, माण ता.मुळशी जि.पुणे (रिक्षा नं. एम.एच.२० ए.जी. ७९०६ वरील चालक) **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी आरोपी क्र १ याने तसेच आरोपी क्र २ यांनी त्यांचकडील वाहन हे वाहतुक नियमांचे दुर्लक्ष करून बेदरकारपणे रॉंगसाईटने चालवुन अपघातास तसेच अपघातामध्ये फिर्यादी यांची मुलगी वय-२३ वर्षे धंदा-खाजगी नोकरी हिच्या मृत्युस कारणीभुत ठरला आहे म्हणुन |

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि गाढवे ९५१८५१०३९३

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ११५५/२०२३ भा.द.वि.कलम ४२०, ४०६, ३४ सह महाराष्ट्र ठेवीदारांचा हितासंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३, ४ अन्वये

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१३.०६.२०२३ रोजी ते आज पावेतो.व्हिजन वन मॉल, भूमकर चौक, ऑफीस नंबर ४२३, ४२४, ४०१, ४०२ चौथा माळा, मुंबई पुणे हायवे लगत, वाकड, पुणे.

गुन्हा दाखल :- दि.०१/१२/२०२३ रोजी १७/२९ वा

फिर्यादी :- सुहास रमेशचंद्र राक्षे, वय ४९ वर्षे, धंदा पत्रकार, रा. मधुरा अंगण, बी प्लॉट नंबर १०२, चंद्रभागा कॉर्नर, मुकाई चौक, रावेत,

आरोपी :- रेंटोला कंपनीचे डायरेक्टर १. संदीप कुमार लाल बहादुर, रा. प्लॉट नं ८०५, बी विंग, सप्तगिरी अपार्टमेंट, बाणेर, पुणे मूळ राहणार नरईपुर, पोस्ट रगडीह, आझमगढ, उत्तर प्रदेश.

२. सीमा मित्तल, ऑफीस पत्ता – व्हिजन वन मॉल, भूमकर चौक, ऑफीस नंबर ४२३, ४२४, ४०१, ४०२ चौथा माळा, मुंबई पुणे हायवेलगत, वाकड, पुणे.

**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी इंस्टाग्राम व फेसबुक अकाऊंटवर रेंटोला या कंपनीची एक जाहिरात पाहीली त्यामध्ये थ्री व्हीलर टेम्पो रेंन्ट प्लॉन इन्वेस्ट अमाऊंट ४,२०,०००/- मंथली अरनिंग ३१,०००/- कॅन्टॉक्ट ३ वर्षे ८० टक्के फायनान्स अव्हेलेबल वाहनाची सर्व देखभाल कंपनीकडे चालकाचा पगार कंपनीकडे अशी जाहीरात पाहुन त्यांनी कंपनीस भेट देवुन खात्री करुन ती ऑफर आवडल्याने फिर्यादी यांनी रेंटोला कंपनीचे एचडीएफसी बँक खाते क्र ५०२०००७९१६११५४ यावर दिनांक १३/०६/२०२३ रोजी २१,०००/- रु क्युआर कोड व्दारे व दिनांक १७/०८/२०२३ रोजी आयएमपीएस व्दारे ९०,०००/- रु असे एकुण १,११,०००/- रुपये भरुन रेंटोला कंपनीचे डायरेक्टर आरोपी क्र १ यांच्या सोबत नियम व अटी बाबतचा करार केला. दि. १०/११/२०२३ रोजी १२,०००/- रु फिर्यादी यांच्या खात्यावर पाठविले असता फिर्यादी यांनी पैसे कमी का मिळाले या बाबत विचारणा केली असता कंपनीची पॉलीसी आता बदलली आहे असे सांगितल्याने फिर्यादी यांनी काहीतरी गडबड असल्याचे लक्षात आले. फिर्यादी हे कंपनीत चौकशी करण्यासाठी गेले असता कंपनीचे अकाऊंटंट कृष्णा बळवंत कुलकर्णी यांचे कडुन तसेच त्याठिकाणी जमलेल्या लोकांकडुन माहिती घेतली असता फिर्यादी यांच्या सह एकुण ७३२ लोकांची ७ कोटी रू चे आसपास गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवून व विरेंद्र काटें यांना १७,७५,०००/- रुपये घेवुन त्यांना फ्रेंचायसी देवुन त्याचा मोबदला न देता तसेच इतरांची देखील आरोपी नामे रेंटोला कंपनीचे डायरेक्टर आरोपी क्र १ व २ यांनी फिर्यादी व इतरांचा देखील विश्वास संपादन करुन गुंतवणुक करण्याचे आमिष दाखवुन, थ्री व्हीलर इलेक्ट्रीक व्हेईकल कर्ज काढुन देतो असे सांगुन कमी मोबदला देवुन अन्यायाने विश्वासघात करुन फसवणुक केली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि मेटे ९४०५१२११५३

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण १०३९/२०२३ भादवि का क. ३८० प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि १०/०७/२०२३ रोजी १५/०० वा चे सुमारास ते दि ०१/१२/२०२३ रोजी सकाळी १०/०० वा चे दरम्यान मौजे शेलपिंपळगाव दावडी रोड ता खेड जि पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.०१/१२/२०२३ रोजी १८/५० वा

फिर्यादी :- महीला फिर्यादी

आरोपी :- १)प्रथमेश राधि दौंडकर वय २० वर्ष रा पाटीलवस्ती शेलपिंपळगाव ता खेड जि पुणे

२)सुरज शंकर धादवड वय २३ वर्ष रा सदर

**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे राहते घरी कपाटात ठेवले असताना राहते घराचा दरवाजा उघडा राहिला असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने उघडा राहीलेल्या दरवाजावाटे आत प्रवेश करुन कपाटातील

९००००/- रुपये किंमतीचे ३६.७३०ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण व ८०००/- रुपये किंममीचे ३ ग्रॅम वजनाचे पँडल फिर्यादी यांचे समतीशिवाय चोरुन नेले आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा सोनवणे ९१७५९०४१००

०९.

पोस्टे व गु रजि.नं. :- सांगवी ६१५/२०२३ भा.दं.वि.कलम ३७०,(३) सह अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ४,५

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ३०/११/२०२३ रोजी २०/०५वा.चे सुमारास जगताप डेअरी जवळ, विशालनगर, डिपी रोड, पिंपळे निलख पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि ०१/१२/२०२३ रोजी ०५/४४ वा.

फिर्यादी :- गणेश सिताराम कारोटे वय ३७ वर्षे पोना १७६८ नेमणूक- अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, पिंपरी चिंचवड

आरोपी :- महीला आरोपी

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद महीला आरोपी हिने स्वतःचे अर्थिक फायद्यासाठी पिडीत २ महिला यांना पैशांचे अमिष दाखवुन त्यांचेकडून वेश्याव्यवसाय करवुन घेऊन त्यातून मिळालेल्या रकमेतून स्वतःची उपजिवीका भागवित असताना मिळून आल्या म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- वपोनि घाडगे ९८७०१६८६४७

१०.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली ७७१ /२०२३ भा.दं.वि. कलम ३२८, २६९, २७०, २७२, २७३, प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१/१२/२०२३ रोजी १५.१० वा. विसावा चौक, कुदळवाडी,चिखली पुणे.येथील चौकामध्ये सार्वजनीक रस्त्याच्या कडेला एक ग्रे रंगाच्या होंडा सिटी कार क्र.एम.एच.१२ जी.एफ.९१८३ ही पार्क करुन तिचेमध्ये.

गुन्हा दाखल :- दि.१/१२/२०२३ रोजी १९/५८ वा

फिर्यादी :- सुनिल बबन शिंदे, पोलीस हवालदार ७०९ नेमणुक चिखली पो.ठाणे पिंपरी चिंचवड

आरोपी :- राजेश सावलाराम चौधरी, वय ४३ वर्षे, धंदा. व्यवसाय, सध्या रा. जाधववाडी, चिखली, पुणे. मुळगाव-हरियाडा, थाना. कापरडा, ता. बिलाडा, जि. जोधपुर, राजस्थान.
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी आरोपी याने त्याच्या ताब्यातील एक ग्रे रंगाच्या होंडा सिटी कंपनीची कार तिचे आर.टी.ओ. क्र.एम.एच.१२ जी.एफ.९१८३ हिचेमधुन शुध्द प्लस सिल्व्हर पान मसाला नावाचे गुटख्याचे पुडे व एस. सिल्व्हर चुविंग टोबॅको नावाचे तंबाखु मसाला पुडे या सारख्या प्रतिबंधित अन्न पदार्थाची विक्री करण्यास महाराष्ट्र राज्यामध्ये बंदी असताना त्याची बेकायदेशीरपणे विक्री करण्याकरीता एकुण ३१७३२५/- रूपये किंमतीचा माल स्वताचे ताब्यात बाळगले स्थितीत मिळुन आला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि बारावकर ९८२३३५५०६०